# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या बुधवार दि. २९ सप्टेंबर २०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १३१ वी बैठक बुधवार दि.२९ सप्टेंबर २०१० रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे, भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| २) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ३) | मा.श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा.श्री.कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ६) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ७) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ८) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ९) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्या |
| १०) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| ११) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १२) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १३) | मा.श्री.हेमराज शाह | सदस्य |
| १४) | मा.श्री.हरिष सणस | सदस्य |
| १५) | मा. श्री.तारीक फारुकी | सदस्य |
| १६) | श्री.पी.पी.महिषी, निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |
| १७) | उपकर निर्धारक व संकलक (रिपेअर सेस) महापालिका | निमंत्रक |
| १८) | कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर महानगरपालिका | निमंत्रक |
| १९) | श्री.ओ.बी.साहू | सह मुख्य अधिकारी |

सचिव श्री.महिषी यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांचे स्वागत करुन मा. सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली. बैठकीच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी ज्या 2 इमारती कोसळून अपघात झालेला आहे, त्याबद्दल माहिती विचारली होती. यावर सन्मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी पृष्ठ क्र.1 व 2 वर कोसळलेल्या इमारतींच्याबाबतीत त्यांनी माहिती विचारुनदेखील त्यांच्या नावाचा उल्लेख बैठकीच्या इतिवृत्तात नसल्याबाबत नाराजी व्यक्त केली. त्यावर सचिव यांनी दिलगिरी व्यक्त करुन इतिवृत्तात सदर बाबीची नोंद घेण्यात येईल, असे सांगितले.

**बाब क्रमांक - १३१.१**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची दि.१७/०८/२०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.०१ ते ११ वर सादर करण्यात आले.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी बँकेमार्फत भाडेवसुलीचे पुढे काय झाले, अशी विचारणा केली असता उपमुख्य (पु.गा.) यांनी बँकेमार्फत भाडेवसुली ऑक्टोबर महिन्यापासून (घटस्थापनेपासून) सुरु होईल असे सांगितले. तसेच मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी जर एखादा भाडेकरु वर्षभराचे भाडे आगावू (advance) भरत असेल तर, त्याला त्यात काहीतरी सुट देण्यात यावी, असे मागिल बैठकीत सूचविल्यानुसार त्यावर काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी केली असता श्री.ढोले, उपमुख्य अभियंता (परिमडळ-१) यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली. बेस्ट आणि महानगरपालिका यांचेकडे पाठपुरावा करुन लेखी स्वरुपात माहिती घेतलेली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे महानगरपालिका, बेस्टकडून अशी सवलत दिली जात नाही. या बाबत अधिक माहिती घेऊन मा.मुख्य अधिकारी यांनी पुनर्रचित गाळयांबाबत ही सवलत देता येईल का, हे तपासून सादर करण्याबाबत श्री.ढोले, उपमुख्य अभियंता (परिमंडळ-१) यांना सूचना दिल्या.

मा.सदस्य श्री. किसन जाधव यांनी व्हेकेशन नोटीसबाबत कोणती कार्यवाही करण्यांत आली याबाबत पुन्हा विचारणा केली असता व्हेकेशन नोटीस अंतिम करुन बुकलेट तयार केलेले आहे, असे सहमुख्य अधिकारी यांनी सांगितले व त्या व्हेकेशन नोटीसच्या झेरॉक्स प्रती सर्व सन्मा.सदस्यांना देण्यात आल्या. सर्व सन्मा.सदस्यांनी व्हेकेशन नोटीसमध्ये काही सुधारणा सुचवावयाच्या असतील तर त्या सुचवाव्या असे मा.मुख्य अधिकारी यांनी सांगितले. सदर सूचना लक्षातघेवून व प्रशासनातर्फे संभाव्य सुधारणा एकत्रित करुन अंतिम प्रारुप मंडळाच्या आगामी बैठकीत बाब टिप्पणीसहीत सादर करण्यात येईल, असे सहमुख्य अधिकारी,दुवपु.मंडळ यांनी सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.शरद शिरिषकर यांनी मागील बैठकीत ग/द विभागातील अव्दैता इमारतीमधील दोन गाळयांबाबत खात्री करुन आवश्यकतेप्रमाणे म्हाड कायद्यातील ६६ चा निष्कासनाचा प्रस्ताव तयार करण्यात आला का, अशी विचारणा केली. त्यावर श्री.सेठ, कार्यकारी अभियंता, ग/द विभाग यांनी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे, असे सांगितले. यावर श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी/पु.गा.यांचे कार्यालयात सदर प्रस्ताव प्रलंबित असून, त्यावर कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले.

मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी आमदार निधीतून होणा-या कामांमध्ये हात असलेल्या दिरंगाईबद्दल विचारणा केली. त्यांनी इ.क्र.१३, छोटानी मार्ग या इमारतीचे दुरुस्ती काम वेळेवर सुरु करण्याबाबत संबंधित विभागामार्फत कारवाई झाली नाही असे सांगितले. अशा प्रकारच्या अनेक इमारतींचे दुरुस्तीचे काम रखडल्याचे सांगितले. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी श्री.ढोले, उपमुख्य अभियंता (परिमंडळ-१) यांना सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांची वेळ घेवून अशा इमारतींचे स्थळनिरिक्षण करुन पुढील अनुषंगीक कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या.

तसेच सन्मा.सदस्य श्री.सुबोध बांदिवडेकर यांनी पृष्ठ क्र.10 वर उपस्थित केलेल्या मुद्दयामध्ये त्यांच्या नावाचा उल्लेख नसल्याचे सांगितले. त्यावर सचिव यांनी दिलगिरी व्यक्त करुन इतिवृत्तात सदर बाबीची नोंद घेण्यात येईल, असे सांगितले.

वरील सविस्तर चर्चेअंती मा.सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या इतिवृत्तात नोंद घेवून कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक - १३१.२**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.
परिमंडळ-१ मधील (अ,ब,सी-१/२/३ विभाग) २५ इमारती.

मंडळासमोर सादर केलेल्या दुरुस्ती कामांच्या प्रस्तावात इमारतीच्या नावाचा उल्लेख करण्याच्या स्पष्ट सूचना देवूनही त्याचे पालन होत नाही, याबद्दल सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव व इतर सन्मा.सदस्य यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी सर्व उपमुख्य अभियंता यांना अशा सूचना दिल्या की, या पुढील दुरुस्ती कामांच्या प्रस्तावात इमारतीच्या नावाचा उल्लेख करुनच प्रस्ताव सादर करावेत. अन्यथा बाब टिप्पणी मंडळासमोर सादर केली जाणार नाही व त्यामुळे होणा-या संभाव्य परिणामास ते जबाबदार रहातील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. १३ ते १९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३१/१११९**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण २५ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.६,०३,०४,४५५/-(रुपये सहा कोटी,तीन लक्ष,चार हजार,चारशे पंचावन्न फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.३,३२,५३,४०५/- (रुपये तीन कोटी, बत्तीस लक्ष,त्रेपन्न हजार, चारशे पाच फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३१.३**

विषय - इमारत क्रमांक ५४८-५५२ रंगवाला इमारत, डॉ.इ.मोझेज रोड, ह्या इमारतीस **प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२००० प्रती चौ.मी. मंजूरी मिळणे बाबत.**

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.२१ ते २३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३१/११२०**

इमारत क्रमांक ५४८-५५२ रंगवाला इमारत, डॉ.इ.मोझेज रोड, ह्या इमारतीच्या दुरुस्तीबाबत रु.२०००/- प्रती चौ.मी.च्या मर्यादेत सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

## आयत्यावेळेचे विषय

**बाब क्रमांक - १३१.४ (१)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-१ मधील (अ,ब,सी-१/२/३ विभाग) २१ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. २५ ते ३१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३१/११२१**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण २१ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.३,१७,२०,४३७/-(रुपये तीन कोटी,सतरा लक्ष,वीस हजार,चारशे सदोतीस फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,९८,०८,६२४/- (रुपये एक कोटी, अठ्ठयाण्णव लक्ष,आठ हजार, सहाशे चोवीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३१.४ (१ अ)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-१ मधील (अ,ब,सी-१/२/३ विभाग) ०४ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ३३ ते ३७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३१/११२२**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०४ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.७८,८४,७७३/-(रुपये अठ्ठयाहत्तर लक्ष,चौ-याऐंशी हजार,सातशे त्र्याहत्तर फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.४१,०१,६५१/- (रुपये एकेचाळीस लक्ष,एक हजार, सहाशे एक्कावन्न फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३१.४ (२)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-२ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,ग-दक्षिण) २२ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ३९ ते ४३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३१/११२३**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण २२ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.४,५२,०७,४४६/-(रुपये चार कोटी,बावन्न लक्ष,सात हजार,चारशे सेहचाळीस फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.३,०१,३७,१६१/- (रुपये तीन कोटी,एक लक्ष,सदतीस हजार, एकशे एकसष्ट फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३१.४ (३)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-३ मधील (ई-१,ई-२,फ-दक्षिण) १६ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ४५ ते ४९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३१/११२४**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १६ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.५,२६,६२,५९६/-(रुपये पाच कोटी,सव्वीस लक्ष,बासष्ट हजार,पाचशे शहाण्णव फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.२,६४,६३,२३०/- (रुपये दोन कोटी,चौसष्ट लक्ष,त्रेसष्ट हजार, दोनशे तीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३१.४ (४)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-४ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-४ मधील (फ/उ व ग/उ विभाग) १९ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ५१ ते ५५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३१/११२५**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १९ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,९१,५६,७३२/-(रुपये दोन कोटी,एक्याण्णव लक्ष,छपन्न हजार,सातशे बत्तीस फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,६५,१३,७६९/- (रुपये एक कोटी,पासष्ट लक्ष,तेरा हजार, सातशे एकोणसत्तर फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३१.५**

विषय - इ.क्र.४-६ संजना बिल्डींग, फॉरजेट हिल रोड, मुंबई मलबार हिल विभाग या इमारतीच्या पुनर्बांधणीचे योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ५७ ते ६१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३१/११२६**

इ.क्र.४-६ संजना बिल्डींग, फॉरजेट हिल रोड, मुंबई मलबार हिल विभाग या इमारतीस रु.४,७५,५४,४८२/- (रुपये चार कोटी, पंच्याहत्तर लक्ष, चोपन्न हजार, चारशे ब्याऐंशी फक्त) (भूसंपादनासहीत) खर्च अपेक्षित असून या पुनर्बांधणीच्या योजनेस रु.४,७५,५४,४८२/- (रुपये चार कोटी, पंच्याहत्तर लक्ष, चौपन्न हजार, चारशे ब्याऐंशी फक्त) एवढया रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली

**बाब क्रमांक - १३१.६**

विषय - इ.क्र.३७-४५ पंचायतवाडी, मुंबई या इमारतीच्या ना हरकत प्रमाणपत्र (परताव्यासह) संरचनात्मक दुरुस्तीबाबत.
- अंमलबजावणी पध्दतीत झालेल्या बदलाबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ६३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३१/११२७**

इ.क्र.३७-४५ पंचायतवाडी, मुंबई या इमारतीच्या दुरुस्ती अंजदापत्रकास मंडळाच्या दि.१७/०४/२०१० रोजीच्या १२६ व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. या बैठकीत सादर केलेल्या या इमारतीच्या अंदाजपत्रकात नजरचुकीने "**ना हरकत प्रमाणपत्र**" **(परताव्यासह)** अशा उल्लेखाऐवजी मंडळामार्फत पाचवा टप्पा असा उल्लेख करण्यात आलेला आहे. सदर इमारतीच्या दुरुस्तीचे काम ना हरकत प्रमाणपत्र परताव्यासह करावयाचे होते. तरी मंडळामार्फत इ.क्र.३७-४५ पंचायतवाडी या इमारतीची दुरुस्तीस पाचवा टप्पा ऐवजी "**ना हरकत प्रमाणपत्र**" **(परताव्यासह)** या बदलास सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १३१.७**

विषय - हातिसकर मार्ग, प्रभादेवी येथील "दत्तप्रसाद" या इमारतीचे भूमिगत पाण्याच्या टाकीवर लोखंडी ग्रील लावणेबाबत.

उरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ६५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्ताव स्थगित ठेवून त्यावर आगामी बैठकीत चर्चा करण्याचे सर्वानुमते ठरले.

**बाब क्रमांक - १३१.८**

विषय - इ.क्र.१०८-१०८-अे बोरा बाजार स्ट्रिट, फोर्ट मुंबई ही दुरुस्ती मर्यादेपलिकडील म्हाड अधिनियम कलम ८८ (३) (अ) अंतर्गत घोषित रद्द करण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ६७ ते ६९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३१/११२८**

इ.क्र.१०८-१०८-अे बोरा बाजार स्ट्रिट, फोर्ट मुंबई ही दुरुस्ती मर्यादेपलिकडील म्हाड अधिनियम कलम ८८ (३) (अ) अंतर्गत घोषित रद्द करण्याबाबत तसेच इमारतीच्या दुरुस्तीसाठी मंडळाच्या यादीवरील वास्तुशास्त्रज्ञाची पुन्हा नेमणूक करुन येणा-या अंदाजपत्रकानुसार अतिरिक्त रक्कम भाडेकरु/रहिवाशी यांनी मंडळाकडे भरल्यानंतर इमारत दुरुस्ती करण्यास परवानगी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**बाब क्रमांक - १३१.९**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदापत्रकांना प्रशासकिय मान्यता देण्याबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ७१ ते ७३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३१/११२९**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०२ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.३७,९३,९८०/-(रुपये सदोतीस लक्ष,त्र्याण्णव हजार,नऊशे ऐंशी फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१४,९९,८००/- (रुपये चौदा लक्ष,नव्याण्णव हजार, आठशे फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३१.१०**

विषय - इमारत क्र.४७-अे, कफ परेड रोड, कुलाबा, मुंबई या इमारतीच्या ना हरकत प्रमाणपत्र (परताव्यासह) संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ७५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३१/११३०**

इमारत क्र.४७-अे, कफ परेड रोड, कुलाबा, मुंबई या इमारतीच्या पाचव्या टप्प्यातील ना हरकत प्रमाणपत्र (परताव्यासह) संरचनात्मक दुरुस्तीस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

सन्मा.सदस्य श्री.शरद शिरीषकर यांनी त्यांचेकडे असलेल्या रिक्त गाळयांची यादी वाचून दाखविली. त्यातील किती गाळे विकलेले आहेत याबद्दलची माहिती विचारली असता, मा.मुख्य अधिकारी यांनी त्यांचेकडील यादीची झेरॉक्स प्रत श्री.मठपती, उपमुख्य अधिकारी/पु.गा.यांना सदर बाब तपासून त्याची माहिती सन्मा.सदस्य श्री.शरद शिरीषकर यांना द्यावयास सांगितले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी हस्तांतरणाकरीता सुध्दा ३/३ महिन्याचा कालावधी लागतो. तसेच एक खिडकी योजनेमधून संक्रमण शिबीरात जागा मिळावी म्हणून केलेल्या अर्जांवर उत्तर मिळत नाही, अशी तक्रार केली. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, एक खिडकी योजना बंद केलेली आहे. त्यामुळे अर्जदारांनी कार्यकारी अभियंता यांचेकडे अर्ज करावयास पाहिजे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी वर्तमानपत्रात धारावी संक्रमण शिबीराबाबत आलेल्या बातमीवर काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली. त्यावर मा.मुख्य अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली - "धारावी संक्रमण शिबीराची सखोल तपासणी 17 पथकांची नेमणूक करुन दि.15/09/10 ते दि.17/09/10 या कालावधीत करण्यात आली. सदर पथकाचा तपासणी अहवाल व मंडळाकडील कागदपत्रे विचारात घेता 45 संक्रमण गाळे विक्री केल्याचे तसेच जवळपास 502 गाळे बंद आढळून आलेले आहेत. सखोल कार्यवाही करण्याचे अनुषंगाने मा.उपाध्यक्ष/प्रा.यांचेकडे टिप्पणी सादर करुन त्यास मान्यता घेतलेली आहे. त्यांचे मान्यतेप्रमाणे दोन भाडे वसुलीकारांना निलंबीत करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच 45 संक्रमण गाळयांची विक्री केलेल्या संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिलेले आहेत. जे 502 गाळे बंद आहेत ते सर्व गाळे आजच दि.29/09/10 रोजी सिलबंद करणार आहोत. याची जबाबदारी श्री.मिलींद पाटील, उपमुख्य अभियंता (परिमंडळ-4) यांचेवर सोपविण्यात आलेली आहे. तसेच धारावी संक्रमण शिबीरासंदर्भात फौजदारी गुन्हा दाखल करण्याची जबाबदारी श्री.सागर, उपमुख्य अधिकारी (सहकार कक्ष) यांचेवर सोपविण्यात आलेली आहे. तसेच सहकार नगर संक्रमण शिबीरासंदर्भात ज्या गाळयांमध्ये घुसखोरी झालेली आहे, त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची जबाबदारी श्री.गोटे, उपमुख्य अधिकारी (सं.शि.) यांचेवर सोपविण्यात आलेली आहे. याचा अहवाल तीन ठिकाणी (कार्यकारी अभियंता, उपमुख्य अधिकारी/सं.शि. आणि उपमुख्य अभियंता/परिमंडळ-4) उपलब्ध होणार आहे. तो अहवाल अद्ययावत आहे किंवा नाही याकडे सहमुख्य अधिकारी यांनी जातीने लक्ष द्यावयाचे आहे." यावर सन्मा.सदस्य श्री.हेमराज शहा यांनी पुढील बैठकीत विस्तृत अहवाल सादर करण्यास सूचना केली. सन्मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी सदर बाबीची गंभीर नोंद घेवून सदर वसाहतीच्या झालेल्या दुरावस्थेबाबत खेद व्यक्त केला. आगामी काळात मंडळाकडे मिल लॅन्डच्या जागेवर विकास कामातून मंडळास नवीन संक्रमण गाळे प्राप्त होणार आहेत. तेव्हा सदर गाळयांची परिस्थिती धारावी संक्रमण शिबीरासारखी होवू नये, याबाबत आतापासूनच मंडळामार्फत काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना केल्या.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी ३३ (७) खाली ना हरकत प्रमाणपत्र दिलेल्या इमारतींच्या दुरुस्ती व इतर कामांकरीता मंडळाने केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती किती विकासकांनी केलेली आहे, याची माहिती मागितली. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, ना हरकत प्रमाणपत्र दिलेल्या इमारतींच्याबाबतीत खर्चाची प्रतिपूर्ती विकासकाकडून त्यास भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याकरीता परवानगी देण्याअगोदर करण्यात येते. त्यामुळे सदर बाबीस थोडा विलंब होतो. तथापि,आता ज्या इमारतींवर मंडळाने खर्च केला असेल तो ना हरकत प्रमाणपत्र देण्याअगोदर वसुल करण्याची शक्यता पडताळून पाहण्यात येईल.

सन्मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी असे सुचविले की, कमित कमी ५०० संक्रमण गाळे आपतकालीन परिस्थितीत वितरण करण्याकरीता मंडळाच्या ताब्यात असावेत.

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता,
मुं.इ.दु.व पु.मंडळ

१३/१०/१०

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,
मुं.इ.दु.व पु.मंडळ